# मराठी भाषेतील म्हणी व त्याचे अर्थ

- आपल्याच पोळीवर तूप ओढणे - फक्त स्वतःचाच फायदा साधून घेणे
- आकारे रंगती चेष्टा - बाह्य लक्षणांवरून अंतर्गत वागणुकीचे चित्र स्पष्ट होते.
- आपली पाठ आपणास दिसत नाही - स्वतःचे दोष स्वतःला दिसत नाही.
- अर्थीदान महापुण्य - दान नेहमी सत्पात्री करावे.
- आगीतून उठून फुफाट्यात पडणे - एका संकटातून निघून दुसऱ्या संकटात सापडणे.
- अळी मिळी गुप चिळी - आपले रहस्य गुपित ठेवण्यासाठी दुसऱ्याला चप करणे.
- आलिया भोगासी असावे सादर - तक्रार न करता आलेली परिस्थिती स्वीकारणे.
- आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास - मुळातच आळशी व्यक्तीस अजून अनुकूल परिस्थिती निर्माण करणे.
- उचलली जीभ लावली टाळूला - विचार न करता बोलणे
- आपण हसे लोकाला शेंबूड आपल्या नाकाला - दुसऱ्याला आपण ज्या दोषाबद्दल हसतो तोच दोष नेमका आपल्याजवळ असणे.
- आजा मेला नातू झाला - एखादे नुकसान झाले असता त्याच वेळी दुसरी फायद्याची गोष्ट होणे.
- आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन - अपेक्षा केली त्यापेक्षा जास्त मिळणे
- असतील शिते तर जमतील भुते - पैस्यामुळेच चार व्यक्ती आपल्या भोवती असतात.
- अचाट खाणे मसनात जाणे - खाण्यापिण्यात अतिरेक घातक ठरतो.
- अग अग म्हशी मला कोठे नेशी - आपली चूक दुसऱ्याच्या माथी मारणे.
- अन्नसत्री जेवून मिरपूड मागणे - अगोदरच एखादे काम फुकट करून वर मिजास खोरी करणे.
- अडली गाय फटके खाय - अडचणीत सापडनाऱ्याला आणखीच हैराण करणे.
- आपला हात जगन्नाथ - आपली उन्नती आपल्या कार्तुत्वावरच अवलंबून असते.
- आधीच तारे त्यात शिरले वारे - आधीच मर्कट आणि त्यात त्याने मद्यपान करणे.
- मनी नाही भाव देवा मला पाव - कर्म न करता फळ मागणे.
- देव देवळात चीत खेटरात - एका कामास जाणे पण दुसरेच काम करणे.
- कधी गाडीवर नाव तर कधी नावेवर गाडी - सर्वांचेच दिवस येतात समान स्थिती कधीच राहत नाही.
- कुठे जाशी भोगा तो तर तुझ्यापुढे उभा - नको असलेली संकट समोर येणे.
- कावळा बसायशी आणि फांदी तुटायशी - परस्पर संबंध नसतांना योगायोगाने दोन गोष्टी एकाच वेळी घडणे.
- कडी चोर तो माडी चोर - शुल्लक अपराधाचा घडलेल्या मोठ्या अपराधाशी संबंध जोडणे.
- काळ आला होता पण वेळ आली नव्हती - नाश होण्याची वेळ आली होती पण थोडक्यात बचावणे.
- उंदराला मांजर साक्षी - सारख्याच लायकीच्या माणसाने एकमेकांचे समर्थन करणे.
- काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाही - संपत्तीपेक्षा सत्ता महत्वाची ठरते. करंगळी सुजली म्हणून डोंगराएवढी होईल काय - मुळातच लहान वस्तू कितीही प्रयत्न केले तरी मर्यादेपेक्षा वाढत नाही.
- काप गेले पण भोके राहिली - वैभव गेले पण खणा मात्र राहिल्या
- करीन ती पूर्व - मी करीन तेच योग्य असे वागणे.



- उडत्या पाखराची पिसे मोजणे - अगदी सहज चालता चालता एखाद्या अवघड गोष्टीची परीक्षा करणे.
- एका माळेचे मणी - सगळेच सारखे
- उठता लाथ बसता बुक्की - एकसारखा नेहमी मार देणे.
- एकाची जळते दांडी दुसरा त्यावर पेटवू पाहतो विडी - दुसऱ्याचा अडचणीतही स्वतःचा फायदा पाहणे.
- एक ना धड भाराभर चिंध्या - सगळेच अपूर्ण
- एका म्यानात दोन तलवारी राहत नाही - दोन तेजस्वी माणसे एकत्र गुण्यागोविंदाने नांदू शकत नाही.
- उस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये - कोणत्याही गोष्टीचा गैरफायदा घेऊ नये.
- आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येणार? - जे मुळातच नाही त्याची थोडी देखील अपेक्षा करणे व्यर्थच.
- गरजवंताला अक्कल नसते - गरजेपोटी दुसऱ्याचे निमाटपणे सहन करणे.
- गाढवाने शेत खाल्ले ना पाप ना पुण्य - अयोग्य व्यक्तीला एखादी गोष्ट दिल्याने ती वायाच जाते.
- कोळसा जितका उगाळावा तितका काळाच - वाईट गोष्टीचा किती उहापोह केला तरी ती वाईटच
- कोरडया बरोबर ओले जळते - निष्कारण निरपराध्याची अपराध्यासोबत गणना करणे.
- माकडाच्या हातात कोलीत - विध्वंसतोशी माणसाच्या हातात कारभार सोपविणे.
- गाड्याबरोबर नळ्याची यात्रा - मोठ्यांच्या आश्रयाने लहानांचा देखील फायदा होतो.
- गरज सरो वैद्य मरो - आपले काम झाले की उपकारकर्त्याची पर्वा न करणे.




- खाऊन माजावे टाकून माजू नये - पैशाचा , संपत्तीचा गैरवापर करू नये.
- खाणे जाणे तो पचवू जाणे - एखादे कृत्य धाडसाने करणारा त्याचे परिणाम भोगण्यास समर्थ असणे.
- गाढवापुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता - मुर्खाला कितीही उपदेश केला तरी तो व्यर्थच ठरतो.
- कुंभारणीच्या घरातला किडा कुंभारणीचा - आपल्या ताब्यातील वस्तूवर आपलाच हक्क दाखविणे.
- काट्याचा नायटा करणे - राईचा पर्वत करणे.
- खऱ्याला मरण नाही - खरे कधी लपत नाही.
- गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी - एखाद्या गोष्टीची अनुकुलता असुन चालत नाही तर सोबतच तिचा फायदा क्षमता असावी.
- गाढवास गुळाची चव काय - ज्याला एखाद्या गोष्टीचा गंध नाही त्याला त्याचे महत्व निरर्थक असते.
- खायचे दात वेगळे व दाखवायचे दात वेगळे - बोलताना एक बोलायचे आणि प्रत्यक्ष कृती वेगळीच करायची.
- खोट्याच्या कपाळी गोटा - खोट्यापणाने वाईट काम करणाऱ्या माणसाचे शेवटी नुकसान होते.
- कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच - मुर्खाला किती समजावले तरी व्यर्थच.
- काकडीची चोरी फाशीची शिक्षा - अपराध लहान पण शिक्षा मोठी.
- काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही - खरी मैत्री किरकोळ कारणाने भंग होत नाही.
- भरवशाच्या म्हशीला टोणगा - जेथे खात्री वाटली तेथेच निराशा होऊन बसणे
- भोक नको पण कुत्रा आवर - एखाद्यावर उपकार करता नाही आले तरी चालेल पण त्याच्या कार्यात अडथळा आणू नये
- मन राजा मन प्रजा - हुकूम करणारेही आपलेच मन व ते तोडणारेही आपलेच मन
- मस्करीची होते तुस्करी - थट्टेचा परिणाम कित्येकदा भयंकर वाईट होतो
- मरावे परी कीर्तिरूपी उरावे - आपण जगात नसलो तरी कोर्ती राहील तसे काम करावे

- मनाऐवढी ग्वाही त्रिभुवणात नाही - मनासारखा खरे सांगणारा साक्षीदार साऱ्या दुनियेत नाही
- भरल्या गाड्यास सप जड नाही - मोठ्या कामात एखादे छोटे काम सहज होते.
- भांडणाचे तोंड काळे - भांडणाचा परिणाम लाजिरवाणा असतो.
- मान सांगावा जणा नी अपमान सांगावा मना - मान हा लोकांना तर अपमान हा स्वतःला सांगावा.
- मनास मानेल तोच सौदा - आपल्याला आवडेल तीच गोष्ट करणे.
- मनाची नाही पण जनाची तरी - एखादे वाईट कृत्य करताना मनाला काही वाटले नाही तरी जनास काय वाटेल त्याचा विचार करावा.
- मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये - कोणाच्याही चांगुलपणाचा फायदा घेऊ नये.
- भटाला देई ओसरी भट हातपाय पसरी - कोणी केलेल्या उपकाराचा गैरफायदा उठवणे.
- म्हशीचे शिंगे म्हशीला जड नसतात - आपली माणसे आपल्याला नकोशी होत नाही.
- भित्या पाठी ब्रह्मराक्षस - ज्या गोष्टीस आपण भितो तीच गोष्ट पुढे येऊन उभे राहणे
- मानला तर देव नाही तर धोंडा - कोणालाही महत्त्व देणे किंवा न देणे आपल्यावर अवलंबून असते.
- मुंगी होऊन साखर खावी हत्ती होऊन लाकडे मोडू नये - नम्रतेने वागून आपला फायदा करून घ्यावा.
- मारणाऱ्याचा हात धरवतो पण बोलणाऱ्याचे तोंड नाही - दांडग्या व्यक्तीस आवर घालणे सोपे पण बोलणाऱ्यास नाही.
- मातीचे कुल्ले लावण्याने लागत नाही - परक्याला आपला म्हणून तो आपला होत नाही.
- मुंगीला मुताचा पर - जे पैशाने , शक्तीने कमी त्याला थोडासा खर्च व श्रमही जास्त वाटतात.
- मिळमिळीत सौभाग्यापेक्षा झळझळीत वैधव्य बरे - दुबळा पती असल्याने लाभणाऱ्या सौभाग्यापेक्षा पराक्रमी थोर पुरुषाची विधवा असणे भाग्याचे.
- नासली मिरी जोंधळाला हार जात नाही - कर्तृत्ववान माणूस खालावला तरी नादानापेक्षा योग्यच ठरतो.
- पळणाऱ्यास एक वाट शोधणान्यास बारा वाटा - लबाडी करणे सोपे पण ती शोधणे फार कठीण असते.
- पदरी पडले पवित्र झाले - कोणतीही गोष्ट एकदा स्वीकारली तर तिला नावे ठेऊ नये.
- बोले तसा चाले त्याची वंदावी पाऊले - बोलण्याप्रमाणे कृती करणारा वंदनीय ठरतो.
- फासा पडेल तो डाव राजा बोलेल तो न्याय - राजाचा चुकीचा न पटणारा आदेशही मान्य करावा लागतो.
- बोलाचाच भात बोलाचीच कढी - संगळ बोलणचं खर दुसर काहीच नाही.
- फुटका डोळा काजळाने साजरा करावा - दोष जेवढा झाकता येईल तेवढाच झाकावा.
- बापा परी बाप गेला आणि बोंबलतांना हात गेला - एखादी नुकसानीची भरपाई न होता दुसरेच मोठे नुकसान होणे.
- बाजारात तुरी भट भटणीला भारी - उगाचच कल्पनेचा आधार घेऊन भांडण करणे.
- बोलणाऱ्याचे तोंड दिसते पण करणाऱ्याची कृती दिसत नाही - रागावणाऱ्याचे शब्द सर्वांना ऐकू येतात पण वाईट कृती करणाऱ्याचे कृत्य कोणालाच चटकन दिसून येत नाही.
- बुगड्या गेल्या पण भोके राहिले - उत्तम स्थिती गेली पण तिच्या खणा मागे राहिल्या.
- फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचणे - जेथे वैभव भोगले तेथेच वाईट दिवस.
- बैल गेला आणि झोपा केला - विशिष्ट वेळेची गोष्ट ही वेळ निघून गेल्यावर करणे.
- बाप से बेटा सवाई - वडिलांपेक्षा मुलगा अधिक कर्तबगार असणे.



- बाराभाईची शेती काय लागेल हाती - अनेक भागीदार झाल्याने खरे तर नफ्याऐवजी नुकसान होते.
- बडा घर पोकळ वासा - नाव मोठे पण लक्षण खोटे.
- बुडत्याला काडीचा आधार - संकटात दुसऱ्याचे थोडे साह्य सुध्दा महत्त्वाचे वाटते.
- फुल ना फुलाची पाकळी - पूर्ण मोबदल्याऐवजी थोडासा का होईना मोबदला देणे.
- बापाला बाप म्हणेना चुलत्याला काका कसा म्हणेल - जवळच्यांचा मान न ठेवणारा दुसऱ्याचा मान का ठेवील.
- म्हातारीने कोंबडे झाकले तरी उजाडायचे राहत नाही - जी गोष्ट व्हायचीच असेल व ती होऊ नये म्हणून प्रयत्न केले तरी ती झाल्याशिवाय राहत नाही.
- आग सोमेश्वरी बेब रामेश्वरी – एकीकडे संकट आले असताना दुसरीकडे उपाय करणे.
- दैव देते कर्म नेते – दैवाने लाभलेली गोष्ट वाईट वागणुकीमुळे टिकत नाही.
- कोल्हा काकडीला राजी – क्षुद्र मनुष्य मामुली गोष्टीत खुश असतो.
- खाई त्याला खवखवे – जो गुन्हा करतो त्याच्या मनात ते डाचत असते.
- वट राजाची वागणूक कैकाड्याची – श्रीमंतीचा आव आणायचा पण दारिद्र्यासारखे राहायचे.
- अति शहाणा त्याचा बैल रिकामा – वाजवीपेक्षा जास्त शहाणपणा नुकसानकारक ठरतो.
- उथळ पाण्याला खळखळाट फार – अंगात थोडीशी कुवत असुन देखील जास्त दिमाख दाखवणे.
- जशी देणावळ तशी धुणावळ – जसा पैसा द्याल तसे काम होईल.




- दिव्याखाली अंधार – मोठ्या माणसाच्या ठिकाणीही उणीवा असतात.
- पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा – थोड्या मोबदल्यात जास्त काम करून घेणे.
- आधी पोटोबा मग विठोबा – स्वार्थ साधून घेऊन दुसऱ्याला मदत करणे.
- आंधळे दळते कुत्रे पोठ खाते – एकाच्या कामाचा दुसराच फायदा घेतो.
- हलवायाच्या घरावर तुळशीपत्र – दुसऱ्याची वस्तू देतांना औदार्य दाखविणे.
- गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली – झाला तर फायदा, तोटा तर नाहीच
- डोळ्यात केर आणि कानात फुंकर – रोग एक उपाय वेगळाच.
- अति तिथे माती – कोणत्याही गोष्टी अतिरेक हानिकारक असतो.
- आयजीच्या जीवावर बायजी उदार – दुसऱ्याचा पैसा खर्च करून स्वतः मोठेपणा मिरवणे.
- अडला हरी गाढवाचे पाय धरी – वेळप्रसंगी मूर्खाची विनवणी करणे.
- काना मागून आली अन तिखट झाली – मागून येऊन मोठेपण मिरवणे.
- दही खाऊ का, मही खाऊ – हे करावे का ते करावे हे न कळणे.
- नाचता येईना अंगण वाकडे – आपला दोष परिस्थितीवर टाकणे.
- कोड्यांचा मांडा करून खाणे – मिळेल ते गोड मानून खाणे.
- आगीतून फुफाट्यात – लहानातून मोठ्या संकटात पडणे.
- एकादशीच्या घरी शिवरात्र येणे – संकटात आणखी संकट येणे.
- अंथरून पाहून पाय पसरणे – ऐपतीच्या मानाने खर्च करावा.
- तरुणाचे झाले कोळसे आणि म्हाताऱ्याला आले बाळसे – उलटा प्रकार आढळून येणे.
- इच्छा तेथे मार्ग – प्रयत्न केल्यावर यश प्राप्ती होते.
- रात्र थोडी सोंगे फार – थोड्या वेळात पुष्कळ काम करणे.

- इकडे आड तिकडे विहीर – दोन्ही बाजूंनी अडचणीत.
- कामापुरता मामा – गरजेपुरते गोड बोलणे.
- खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी – विलासी जीवनाचीच निवड करणे.
- नाव मोठे लक्षण खोटे – दिखावा मोठा, प्रत्यक्षात उलट परिस्थिती.
- हाताच्या काकणाला आरसा कशाला – प्रत्यक्ष स्पष्ट असणाऱ्या गोष्टीस पुरावा नको असतो.
- गोगलगाय आणि पोटात पाय – एखाद्याचे खरे वागणे न दिसणे.
- खायला काल नि धरणीला भार – निरुद्योगी माणूस सर्वांनाच जड होतो.
- झाकली मुठ सव्वालाखाची – मौज पाठवून स्वतःची लाज रखने.
- घर ना दार देवळी बिऱ्हाड – बायको पोरे नसणारा एकटा मनुष्य.
- घोडे मैदानाजवळ आहे – निकालाची वेळ जवळच आली आहे.
- कणगीत दाना भिल उताणा – गरजेपुरते आहे म्हंटल्यावर उद्याची काळजी न करणे.
- पाचामुखी परमेश्वर – पुष्कळ लोक बोलतात ते खरे.
- सुतासाठी मणी फोडणे अयोग्यच – क्षुल्लक गोष्टीसाठी मौल्यवान वस्तुचा नाश करणे चूक आहे.
- दाखवले सोने हसे मुल तान्हे – मौल्यवान वस्तूचे सर्वांना आकर्षण असते.
- या बोटावरची थुंकी त्या बोटावर घेणे – बनवाबनवी करणे.
- भीड भिकेची बहिण – भीड बाळगून उगाचाच नकार देऊ शकलो नाही तर शेवटी आपल्यावर भिक मागण्याची वेळ येते.
- पाचही बोटे सारखीच नसतात – सर्व माणसांचे स्वभाव सारखे नसतात.
- बाप दाखव नाही तर श्राद्ध कर – अपराध केला नाहीतर तसे सिद्ध करा किंवा अपराध काबुल करा.
- घटका पाणी पिते घड्याळ टोले खाते – आपल्याला कर्मानुसार भोगावे लागते.
- कोळीला नारणी अनघर चंद्रमौळी – अत्यंत दारिद्र्याची अवस्था येणे.
- हा सूर्य हा जटाद्रथ – प्रत्यक्ष पुरावा दाखवून एखादी गोष्ट सिद्ध करणे.
- दुरून डोंगर साजरे – कोणतीही गोष्ट लांबून चांगली दिसते पण जवळून तिचे खरे स्वरूप कळते.
- आवळा देऊन कोहळा काढणे – शुल्लक गोष्टीच्या मोबदल्यात मोठा लाभ करून घेणे.
- सुंठीवाचून खोकला गेला – उपचाराशिवाय आजार गेला.
- शेळी जाते जीवनिशी खाणारा म्हणतो आतड – एखाद्याने आपल्यासाठी केलेल्या श्रमाची त्यागाची किमत न करता त्यातील उणिवा काढणे.
- भुकेला कोंडा निजेला धोंडा – अगदी साधेपणाने राहणे.
- चिंता परा ते येई घरा - दुसऱ्याचे वाईट चिंतले की ते आपल्यावरच उलटते.
- ताकास तूर लागू न देणे - कोणत्याही गोष्टीचा थांगपत्ता लागू न देणे.
- प्रयत्नांती परमेश्वर - प्रयत्नाने कठीण गोष्टही साध्य होते.
- पुढे तिखट मागे पोचट - दिसायला मोठेपण प्रत्यक्षात नसणारे.
- चोर सोडून संन्यासाला सुळी देणे - अपराधी सोडून न अपराध्याला शिक्षा करणे.
- मेल्या म्हशीला मणभर दुध - एखादी व्यक्ती जगातून गेल्यावर त्या व्यक्तीचा गुणगौरव करणे.
- टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही - अपार कष्टावाचून मोठेपण मिळत नाही.
- हात ओला तर मित्र भला - फायदा असेपर्यंत सारे भोवती गोळा होतात.



- मन जाणे पापा - आपण केलेले पाप आपल्याला निश्चितच समजते.
- जावे त्यांच्या वंशाला तेव्हा कळे - दुसऱ्याच्या अडी अडचणीच्या परिस्थितीतून स्वतः गेल्याशिवाय कळत नाही.
- विटले मन आणि फुटले मोती साधत नाही - दुभंगलेली मन जोडली जाणे कठीण.
- बावळी मुद्रा, देवळी निद्रा - दिसण्यात बावळट पण व्यवहारात चतुर व्यक्ती.
- लहान तोंडी मोठा घास घेणे - स्वतःच्या योग्यतेस न शोभेल असे वर्तन करणे.
- भिकेची हंडी शिक्यास चढत नाही - हलक्या प्रतीच्या प्रयत्नांनी उच्च प्रतीचे साकार होत नाही
- नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणे - एखाद्यास लुटून दुसर्याची भर करणे.
- नावडतीचे मीठ अळणी - नावडत्या माणसाचे सर्व दोषयुक्त वाटणे.
- लेकी बोले, सुने लागे - एकाला उद्देशून दुसऱ्याला लागेल असे बोलणे.
- तळे राखील तो पाणी चाखील - कामगिरीतून फायदा वठविणे
- वासरात लंगडी गाय शहाणी - अज्ञानी लोकांत शिकलेला शहाणा ठरतो.
- दृष्टीआड सृष्टी - आपल्या डोळ्याआड घडलेली गोष्ट.
- बुडत्याचा पाय खोलात - हरणारा अधिक हरत जातो.
- घरोघरी मातीच्या चुली - सर्वत्र सारखी परीस्थिती असणे.




- साखरेचे खाणार त्याला देव देणार - चांगल्या इच्छा करणाऱ्याला चांगलेच मिळत राहणार.
- कुडी तशी पुडी - शरीराप्रमाणे आहार असणे.
- नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा - नाव मोठे पण वागणूक कमी प्रतीची असणे.
- चोराच्या मनात चांदणे - गुन्हा करणाऱ्याला अपराधी वाटणे.
- उधारीचे पोते सत्वा हातरिते - उधार घेतलेल्या गोष्टी ठरेलालाच.
- भाकरी असा ताका नोकरी नाका - थोडे खायला असल्यावर जास्तीसाठी कष्टाची तयारी नसणे.
- अधिक सुन पाहुण्याकडे - अधिक सवलतीचा अधिक कामासाठी उपयोग करणे.
- थेंबे थेंबे तळे साचे - छोट्या साठ्वनितून मोठा संग्रह होतो.
- सरड्याची धाव कुंपणापर्यंत - कमजोर माणसाचे काम मर्यादित असते
- दुभत्या गायीच्या लाथा गोड - फायद्यासाठी अपमान सहन करण्याची तयारी असणे.
- अहो रुपम अहो ध्वनि: - स्वता:त उणिवा असलेल्या दोन व्यक्ती एकमेकांचे कौतुक करतात.
- ज्याच हाती ससा तो पारधी - ज्याच्या हाती मेद्देमाल असतो, कार्याचे श्रेय त्यालाच मिळते.
- कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ - आपलेच माणूस आपल्या नाशाला कारणीभूत होणे.
- पायाला पंढरपूर आळशाला गंगा दूर - श्रद्धा नसेल तर परमेश्वर प्राप्त होत नाही.
- आयत्या बिळावर नागोबा - दुसऱ्याच्या श्रमांचा फायदा उठवणे.
- विशी विद्या तिशी धन - योग्य वयात योग्य ती कामे व कर्तुत्व करणे.
- हाजीर तो वजीर - जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो.
- उतावळा नवरा गुढग्याला बाशिंग - अतिशय उतावळेपणाने होणाऱ्या.

- एक हाताने टाळी वाजत नाही - भांडणाचा दोष एक पक्षाकडेच असत नाही.
- ऐकावे जनाचे करावे मनाचे - सर्वांचा विचार घ्यावा व आपणास योग्य वाटेल ते करावे.
- दाम करी काम - पैशाने सर्व कामे साध्य होतात.
- चढेल तो पडेल - उत्कर्षासाठी धडपडणाऱ्याला अपयश आले तर त्यात कमीपणा येत नाही.
- कावळ्याच्या शापाने गायी मरत नसतात - क्षुद्र माणसाच्या निंदेने थोर माणसाचे काही नुकसान होत नाही.
- खान तशी माती - आई बाबा प्रमाणे मुले.
- कसायाला गाय धार्जीणी - भांडखोर व अनीतिमान गुंडांपुढे गरीब माणसे नमतात.
- कसायाला गाय धार्जीणी - भांडखोर व अनीतिमान गुंडांपुढे गरीब माणसे नमतात.










adda247 मराठी